नागपूर महानगरपालिका, नागपूर

स्थानिक संस्था कर विभाग

स्थानिक संस्था कर मार्गदर्शिक पुस्तिका

स्थानिक संस्था कर मार्गदर्शिका

प्रश्न 1 नोंदणी कोणी करावी ?

उत्तर (1) क. आयातदार – म्हणजेच शहराच्या हद्दीबाहेरुन शहराच्या हद्दीत माल आणणारा अथवा आणविणारा व्यापारी/उद्योजक. त्यानी वर्षभरात आयात केलेल्या सर्व मालाचे मूल्य रु.1,00,000/– पेक्षा कमी नाही.

ख. केवळ शहराच्या हद्दीतील व्यापाऱ्यांकडूनच खरेदी करणारा व्यापारी/उद्योजक, त्याची सर्व खरेदी च विक्रीची उलाढाल वर्षभरात रुपये 5,00,000/– लाखापेक्षा कमो नाही.

(2) शहराच्या हद्दीत एखादा विशिष्ट धंदा नियमितपणे न करणारा एखादा व्यापारी किंवा व्यक्ती शहराच्या हद्दीत तात्पुरत्या स्वरूपात एखादा धंदा करत असेल तर अशा परिस्थितीत तात्पुरता धंदा सुरू करण्याच्या 15 दिवसापूर्वी नोंदणी अर्ज करणे आवश्यक आहे.

पश्न 2 तात्पुरत्या स्वरुपात धंदा करणाऱ्या व्यापाऱ्यास नोंदणी करणे आवश्यक आहे काय ?

उत्तर हाय

प्रश्न 3 खरेदी–विक्रीची उलाढाल म्हणजे काय ?

उत्तर व्यापाऱ्याने केलेल्या सर्व विक्रीची उलाढाल किंवा सर्व खरेदीची उलाढाल ही हिशोबात घेण्यात येईल. अशा मालाची विक्री किंवा खरेदी ही या अधिनियमाच्या आणि नियमाच्या तरतुदी अन्वये करयोग्य असो किंवा नसो. उलाढालीमध्ये व्यापाऱ्याने स्वतःच्या वतीने आणि त्याच्या लेख्यामध्ये नमूद केलेल्या सर्व विक्रीचा किंवा खरेदीचा अंतर्भाव असेल तसेच व्यापाऱ्याने किंवा व्यापाऱ्याच वतीने लिलाव केलेल्या मालाच्या रकमेचा समावेश उलाढालीमध्ये होईल.

प्रश्न 4 अनिवासी व्यापाऱ्याने नोंदणी करण आवश्यक आहे काय ?

उत्तर होय, अनिवासी व्यापाऱ्याने नोंदणी करणे आवश्यक आहे. तसचे अनिवासी व्यापाऱ्याचा शहरामध्ये राहणारा एखादा व्यवस्थापक किंवा एजंट याने देखील नोंदणी करणे आवश्यक आहे. मग असा अनिवासी व्यापारी व्यवस्थापक एजंट स्थानिक संस्था कराच्या तरतुदी नुसार नोंदणी करण्यासाठी पात्र असो किंवा नसो.

प्रश्न 5. स्थानिक संस्था कराची नोंदणी करण्याची व्यवस्था कोठे आहे ?

उत्तर स्थानिक संस्था कराची नोंदणी करण्याची व्यवस्था म.न.पा.च्या दहा झोनल कार्यालयांमध्ये तसेच स्थानिक संस्था कर विभाग मुख्य कार्यालय, रेल्वे फिडर रोड, संत्रा मार्केट, नागपूर येथे करण्यात आली आहे.

प्रश्न 6. व्यापारी जर भागीदारी संस्था असेल आणि जर ती भागीदारी संस्था विसर्जित झाली आणि जर त्या भागीदारी संस्थेकडे स्थानिक संस्था कराची बाकी असेल तर असा बाकी असलेला कर कोणी भरावा ?

उत्तर त्या भागीदार किंवा अशा भागीदारी संस्थेच्या विसर्जनापर्यंत सदस्य असलेला प्रत्येक व्यक्ती स्थानिक संस्था कर व्याजासहित भरण्यास पात्र असेल.

प्रश्न 7. एखादया व्यापाऱ्याने त्याचा व्यवसाय हस्तांतरीत केला असेल आणि जर त्याच्याकडे स्थानिक संस्था कराची बाकी असेल अशा वेळी स्थानिक संस्था कर कोण भरेल?

उत्तर ज्या व्यक्तीकडे अशा व्यवसाय हस्तांतरित केला आहे ती व्यक्ती स्थानिक संस्था कर भरण्यास पात्र असेल.

प्रश्न 8 नोंदणीसाठी पात्र असलेला व्यापारी नोंदणीशिवाय व्यवसाय करु शकतो काय?

उत्तर नाही. तसे केल्यास नियम 48 (2) क अन्वये 5 पट दंडाची तरतुद आहे.

प्रश्न 9 1 एप्रिल 2013 पूर्वीच्या वर्षामध्ये ज्या व्यापाऱ्याने आयात केलेल्या मालाचे मुल्य एक लाखापेक्षा कमी आहे, व त्याची खरेदी व विक्री उलाढाल 5 लाखापेक्षा कमी आहे. परंतू 1 एप्रिल 2013 नंतर जर तो या नियमान्वये नोंदणीस पात्र असेल अशावेळी त्याने नोंदणी करणे आवश्यक आहे काय ?

उत्तर होय. ज्या तारखेस आयात केलेल्या मालाचे मुल्य एक लाख किंवा त्यापेक्षा जास्त झाले किंवा एकूण खरेदी किंवा विक्रीची उलाढाल पाच लाख किंवा त्यापेक्षा जास्त झाली असेल त्या तारखेपासुन 30 दिवसांच्या आत नोंदणी करणे बंधनकारक आहे.

प्रश्न 10. ज्या व्यापाऱ्यास तात्पुरत्या स्वरुपात धंदा/व्यवसाय करावयाचा आहे अशा व्यापाऱ्याने काय करावे ?

उत्तर तात्पुरत्या स्वरुपात धंदा/व्यवसाय सुरु करण्यापुर्वी 15 दिवस अगोदर नोंदणीसाठी अर्ज करणे बंधनकारक आहे. (नियम 9 (2)ग)

प्रश्न 11. कोणत्या व्यापाऱ्यास नोंदणीकृत व्यापारी असल्याचे मानण्यात येईल ?

उत्तर महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम 2002 च्या तरतुदीन्वये ज्याची नोंदणी झाली आहे अशा प्रत्येक व्यापाऱ्यास नोंदणीकृत व्यापारी असल्याचे मानण्यात येईल. (नियम 9 (3)अन्वये)

प्रश्न 12. नोंदणीसाठो शुल्क आकारले जाते काय ?

उत्तर नोंदणी नमुना 'क' भरुन रु.100/– नोंदणी शुल्क भरणे आवश्यक आहे.

प्रश्न 13 नोंदणीसाठी अर्ज कोणी करावा ? अथवा नोंदणीसाठी कोण अर्ज करु शकतो ?

उत्तर अ) व्यवसायाचे मालक अथवा मालकाच्या वतीने कामकाज करण्यासाठी प्राधिकृत असलेली व्यक्ती

ब) भागीदारी संस्था असेल तर तिचे भागीदार

क) अविभक्त हिंदु कुंटुबाचा व्यवसाय असेल तर त्या कुटुंबातील कर्ती व्यक्ती.

ड) व्यावसायिक कंपनी, सहकारी संस्था, महामंडळ, स्थानिक प्राधिकरण असेल अशा बाबतीत संचालक/व्यवस्थापक/सचिव/प्रमुख अधिकारी किंवा त्यांच्या वतीने काम करण्यासाठी कायदेशीररित्या प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती

इ) भागीदारी संस्थाच्या बाबतीत तिचा प्रत्येक भागीदार नोंदणी अर्जासोबत प्रतिज्ञापत्र सादर करील

ई) प्रत्येक नोंदणी अर्जासोबत जी व्यक्ती नोंदणीसाठी अर्ज करीत आहेत त्यांचे स्वतःचे दोन पासपोर्ट फोटो देणे बंधनकारक आहे.

प्रश्न 14. नोंदणीसाठी करण्यात येणाऱ्या अर्जामध्ये व्यावसायिक ज्या वस्तुंचा व्यापार करतो त्या सर्व वस्तुंची नोंद करणे आवश्यक आहे काय ?

उत्तर होय.

प्रश्न 15. एखाद्या व्यापाऱ्याची एकाच नावाने व्यवसायाची ठिकाणे एकापेक्षा जास्त असतील तर नोंदणीसाठी किती अर्ज करावेत ?

उत्तर एकच अर्ज करावा. परंतु त्यामध्ये सर्व ठिकाणांची नोंद असावी. जेवढया ठिकाणी व्यवसायाची ठिकाणे आहेत तेवढी प्रमाणपत्रे स्थानिक संस्था कर विभागाकडुन घेण्यात यावीत व ती व्यवयाच्या प्रत्येक ठिकाणी लावण्यात यावीत.

प्रश्न 16. नोंदणी प्रमाणपत्र हस्तांतरीत करता येईल काय ?

उत्तर नाही..

प्रश्न 17. नोंदणी प्रमाणपत्र कोठे लावावे ?

उत्तर व्यवसायाचे ठिकाणी, दर्शनी बाजूस. एकापेक्षा अधिक ठिकाणी व्यवसाय असल्यास प्रत्येक ठिकाणी नोंदणी प्रमाणपत्र लावावे.

प्रश्न 18 धंद्यामध्ये/व्यवसायामध्ये काही बदल करावयाचा झाल्यास काय करावे ?

उत्तर धंद्यामध्ये/व्यवसायामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करावयाचा झाल्यास त्याबाबतची लेखी माहिती (उदा. आयात करावयाच्या वस्तुमध्ये बदल, भागीदारामध्ये बदल यासारखे इतर बदल.) मा. आयुक्त यांना सादर करावी लागेल.

प्रश्न 19 नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी आयुक्त यांना कळविणे आवश्यक आहे काय ?

उत्तर होय. ज्यांना व्यवसाय बंद करावयाचा आहे अशा व्यवसायिकांनी लेखी नमुन्यामध्ये अर्ज करणे बंधनकारक आहे.

प्रश्न 20 एखाद्या व्यापाऱ्याने धंद्याच्या नावामध्ये बदल केला असेल किंवा जर ती भागीदारी संस्था असेल आणि तिचे विसर्जन न करता रचनेत बदल केला असेल किंवा तो विश्वस्त व्यवस्थेचा विश्वस्त असेल आणि त्या विश्वस्तामध्ये बदल झाला असेल किंवा तो पाल्याच्या पालक असेल व पालकामध्ये बदल झाला असेल तर अशा वेळी परत नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता आहे काय ?

उत्तर नाही. फक्त बदलाबाबतची सविस्तर माहिती स्थानिक संस्था कर विभागास पुरविणे आवश्यक आहे. त्यानंतर नोंदणी प्रमाणपत्रामध्ये त्याप्रमाणे बदल करुन घ्यावेत.

प्रश्न 21 नांदणी प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे/झाल्यामुळे नोंदणी प्रमाणपत्र रद्द झाल्याच्या दिनांकापूर्वी जर त्या व्यावसायिकाकडे स्थानिक संस्था कर/दंड/व्याज इ. ची रक्कम बाकी असेल अशा वेळी अशी रक्कम कोण भरेल ?

उत्तर अशी रक्कम भरण्याची जबाबदारी ही संबंधित व्यावसायिकाची असेल.

प्रश्न 22 धंद्याच्या व्यवस्थापकाचे नाव व्यापाऱ्याने जाहिर करणे आवश्यक आहे काय ?

उत्तर होय. एक महिन्याच्या आत व्यवस्थापकाचे नांव ''नमुना च'' मध्ये मा. आयुक्त यांना कळविणे आवश्यक आहे.

प्रश्न 23. व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या मालाची लेखी नोंद ठेवणे आवश्यक आहे काय ?

उत्तर प्रत्येक व्यापारी खरेदी केलेल्या आणि हस्तांतराच्या तत्वावर मिळालेल्या मालाची नमुना 'घ' मध्ये नोदवही ठेविल :

पंरतु असे की, व्यापारी सदर नोंदवही संगणीकृत स्वरूपात ठेवू इच्छित असल्यास, त्यांना तशी मुभा असेल. मात्र, आयुक्तांनी तपासणीसाठी मागणी केल्यावर महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम, 2002 खाली ठेवण्यात येणारे संबधित दस्तऐवज त्यांना सादर करणे आवश्यक राहील.

पंरतु आणखी असे की, नियम 27 मधील तरतुदीनुसार ठोक रकमेचे प्रदान करण्याचा पर्याय स्वीकारलेल्या आणि सेटऑफ किंवा परताव्याची मागणी करणाऱ्या व्यापाऱ्याव्यतिरिक्त इतराना विक्रीची दस्तऐवज ठेवण्याची आवश्यकता राहणार नाही.

प्रश्न 24 एखाद्या नोंदणीकृत व्यापाऱ्याने शहरातील इतर व्यापाऱ्यांकडून करयोग्य माल खरेदी केला असेल अशावेळी माल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याने काय करावे ?

उत्तर शहरातील ज्या व्यापाऱ्यांकडुन करयोग्य माल खरेदी केलेला आहे त्या व्यापाऱ्यांकडुन स्थानिक संस्था कर नियम 21 व 22 मध्ये नमुद केल्याप्रमाणे माल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याने त्या मालाचे बिजक व प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

प्रश्न 25 मनपा क्षेत्रामध्ये व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाने मनपा क्षेत्रातील काणत्याही इतर व्यावसायिकास माल विकला असेल तर याबाबत विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याने काय करावे ?

उत्तर अशा विक्रो करणाऱ्या व्यापाऱ्याने स्थानिक संस्था कर नियम 22 मध्ये नमुद केल्याप्रमाणे बीजके व प्रमाणपत्र माल खरेदी करणाऱ्यास देणे बंधनकारक आहे. तसेच खरेदी करणाऱ्या व्यावसायिकांची नोंद त्याच्याकडील खरेदी विक्रो रजिस्टरमध्ये ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये त्याचा संपुर्ण पत्ता, त्याच्या धंद्याचे स्वरूप व त्याच्याकडील व्यवसायाचा स्थानिक संस्था कराचा नोंदणी क्रमांक याचा समावेश असेल.

प्रश्न 26 रास्त बाजार मूल्य निर्धारित करण्याचे अधिकार आयुक्त यांना आहेत काय ?

उत्तर होय. असे अधिकार आयुक्त यांना आहेत. ज्यावेळी .रास्त बाजार मूल्य निर्धारित करणे आवश्यक वाटेल अशावेळी माल आयात करणाऱ्या व्यापाऱ्याचे म्हणणे ऐकून घेऊन रास्त बाजार मूल्य निश्चित करता येईल.

प्रश्न 27 मनपा हद्दीमध्ये विक्री/उपभोग/उपयोग या कारणांसाठी कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने अशा मालाची विक्री किंवा खरेदीची किंमत निश्चित केलेली नसेल किंवा असा माल विक्री किंवा खरेदी द्वारे मिळविलेला नसेल अशा मालाच्या बाबत त्या मालाची किंमत निश्चित करता येऊ शकेल काय ?

उत्तर होय. अशा मालाच्या बाबत किंमत निश्चित करता येईल. आयुक्त संबंधित व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस त्याची बाजु मांडण्याची संधी देऊन अशा वस्तुंची रास्त बाजार मुल्य निश्चित करतील (नियम 25)

प्रश्न 28. स्थानिक संस्था करामध्ये ठोक रक्कम भरण्याची तरतुद आहे काय ?

उत्तर होय. नियम 27 अन्वये वर्षाभरातील सर्व खरेदीची उलाढाल रूपये 10 लक्ष पर्यंत असल्यास अशी तरतुद पुढील रकमेच्या मर्यादेपर्यंत आहे

अ.क्र.	वर्षाभरातील सर्व खरेदीची उलाढाल	दरवर्षी प्रदेय असलेल्या स्थानिक संस्था कर
1	रुपये 1,00,000 पर्यंत	काही नाही
2	रुपये 1,00,000 पेक्षा अधिक परंतु रुपये 2,00,000 पेक्षा अधिक नसेल	4,000
3	रुपये 2,00,000 पेक्षा अधिक परंतु रुपये 3,00,000 पेक्षा अधिक नसेल	6,000
4	रूपये 3,00,000 पेक्षा अधिक परंतु रूपये 4,00,000 पेक्षा अधिक नसेल	8,000
5	रूपये 4,00,000 पेक्षा अधिक परंतु रूपये 5,00,000 पेक्षा अधिक नसेल	10,000
6	रूपये 5,00,000 पेक्षा अधिक परंतु रूपये 6,00,000 पेक्षा अधिक नसेल	12,000
7	रूपये 6,00,000 पेक्षा अधिक परंतु रूपये 7,00,000 पेक्षा अधिक नसेल	14,000
8	रूपये 7,00,000 पेक्षा अधिक परंतु रूपये 8,00,000 पेक्षा अधिक नसेल	16,000
9	रूपये 8,00,000 पेक्षा अधिक परंतु रूपये 9,00,000 पेक्षा अधिक नसेल	18,000
10	रूपये 9,00,000 पेक्षा अधिक परंतु रूपये 10,00,000 पेक्षा अधिक नसेल	20,000

10 लाखा पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापाऱ्याना नियमाप्रमाणे एकूण मालाचे खरेदीनुसार होणारा स्थानिकसंस्था कर भरणे आवश्यक आहे.

प्रश्न 29. राज्य व केंद्र सरकाराने मनपा हद्दीमध्ये आयात केलेल्या मालावर स्थानिक संस्था कर लागू होईल काय ?

उत्तर नाही. परतुं संबंधित शासकीय अधिकाऱ्याने असे प्रमाणपत्र सादर केल्यानतंर त्यावर स्थानिक संस्था कर लावला जाणार नाही. तसेच राज्य व केंद्र सरकारने कंत्राटदाराकडून विकत घेतलेल्या मालाची किंमतीत स्थानिक संस्था कर जोडलेला असल्यास अशा प्रसंगी संबंधीत कंत्राटदार स्थानिक संस्था कर भरण्यास पात्र राहील.

प्रश्न 30. एखाद्या व्यापाऱ्याने त्याच्यांकडील कोणताही माल शहराच्या बाहेर प्रक्रिया करण्यासाठी पाठविला असेल व त्यावर प्रक्रिया करून तो माल परत शहरामध्ये आणला जात असेले अशा वेळी त्या पुर्ण मालावर स्थानिक संस्था कर भरणे आवश्यक आह काय ?

उत्तर त्या संपुर्ण मालावर स्थानिक संस्था कर भरण्याची आवश्यकता नाही परंतु प्रक्रियासाठी बाहेर पाठविलेला माल प्रक्रिया केल्यानंतर जर त्याच्या बाहय स्वरूपामध्ये बदल नसेल तर अशा वेळी फक्त प्रक्रियासाठी लागलेल्या मुल्यावर म्हणजेच प्रक्रियेचा खर्च व स्थानांतर खर्च यावर स्थानिक संस्था कर आकारण्यात येईल. परंतु असा शहरामधून बाहेर गेलेला माल शहराबाहेर पाठविल्याच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत संबंधित व्यापाऱ्याने शहरामध्ये आणणे आवश्यक आहे. व अशा व्यापाऱ्याने नोंद संबंधित कालावधीच्या विवरण पत्रामध्ये ठेवली पाहिजे. (नियम 28(3))

प्रश्न 31. शहारातील व्यापारी शहराबाहेरील माल प्रक्रिया करुन परत पाठवित असेलेल तर अशावेळी स्थानिक संस्था कर आकारण्यात येईल काय ?

उत्तर नियम 28 (4) मधील तरतुदींची पूर्तता होत असेल तर अशा मालावर स्थानिक संस्था कर आकारला जाणार नाही.

प्रश्न 32. शहरामधील माल शहराबाहेर विकलेला असेल आणि अशा खरेदीदाराने माल नाकारल्यामुळे तो परत पाठविला असेल तर त्यावर स्थानिक संस्था कर भरावा लागेल काय ?

उत्तर नाही. परंतू असा माल शहराबाहेर पाठविलेल्या तारखेपासून 6 महिन्यांचे आत शहरामध्ये परत मिळालेला असला पाहिजे तसेच अशा मालाची विक्री संबंधित कालावधीच्या विवरणामध्ये दाखविलेली होती अशी आयुक्तांची खात्री पटली पाहिजे.

प्रश्न 33. विवरण पत्र सादर करण्याच्या पध्दती कोणत्या आहेत ?

उत्तर अ. प्रत्येक नोंदणीकृत व्यापारीया नियम 29(1) च्या अधिनतेने त्याने किंवा त्याने नमुना ''च'' मध्ये नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने यथाचितरित्या स्वाक्षरी केलेले संबंधित वर्षातील नमुना ड 2 मध्ये वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर 90 दिवसांच्या आत आयुक्तांस सादर करील.

ब. आयात करणारा नसलेला प्रत्येक नोंदणीकृत व्यापारी वार्षिक निरंक विवरणपत्र सादर करील.

क. नियम 3 उपनियम 2 अन्वये नोंदणीस पात्र असलेला प्रत्येक व्यापारी किंवा व्यक्ती धंदा सुरु असलेल्या कालावधीतील प्रत्येक महिन्याच्या अखेरच्या दिनांकपासून किंवा धंदा एखाद्या कालावधीतपर्यंत बंद केला असेल तर अशा महिन्याच्या दिनांकापासून 10 दिवसांमध्ये स्थानिक संस्था कर प्राधिकाऱ्याकडे नमुना ड 1 मध्ये विवरण पत्र सादर करील.

प्रश्न 34. निर्यातीसाठी शहरामध्ये आयात केलेला माल शहराबाहेर निर्यात केल्यास त्या मालावर भरलेला स्थानिक संस्था कर परत मिळेल काय ?

उत्तर नियम 32 अन्वये शहरामध्ये निर्यातीसाठी आयात केलेल्या मालावर स्थानिक संस्था कर भरला असेल आणि त्या मालावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता शहराबाहेर पाठविला असेल म्हणजेच नियम 32 मधील सर्व अटींची पुर्तता होत असेल तर अशावेळी संबंधीत व्यापाऱ्यान भरलेल्या स्थानिक संस्था करापैको 90% रक्कम परत मिळेल.

प्रश्न 35 स्थानिक संस्था कराची रक्कम केंव्हा भरावी ?

उत्तर स्थानिक संस्था कराची रक्कम तो महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या 20 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे.

प्रश्न 36. विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याने विक्री केलल्या मालाचे बिल न दिल्यास किंवा बिल देण्यास नकार दिल्यास त्यावर काय कारवाई होईल ?

उत्तर अशा वेळी विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर त्याने विक्री केलेल्या मालावर जेवढा स्थानिक संस्था कर होत असेल तेवढी रक्कम विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याचे म्हणणे ऐकुन त्यांच्याकडून वसुल केली जाईल. (नियम 48 (1))

प्रश्न 37 एखाद्या व्यापाऱ्याने नोंदणी न करता व्यापार चालू ठेवला असेल अशावेळी काय कारवाई होऊ शकेल ?

उत्तर नोंदणी न करता ज्या व्यापाऱ्याने त्याचा व्यवसाय चालू ठेवला असेल त्या काळामध्ये त्याने आयात केलेल्या मालावर जेवढया रकमेचा स्थानिक संस्था कर होईल त्याच्या 5 पट रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल.

प्रश्न 38 एखाद्या व्यापाऱ्याने स्थानिक संस्था कर बसण्याजोगा माल शहरामध्ये आणून विकलला व त्यावर नियमाप्रमाणे स्थानिक संस्था कर भरला नाही तर अशावेळी काय तरतुद आहे ?

उत्तर याबाबत स्थानिक संस्था कराच्या पाच पट दंड वसुल करण्याची तरतुद आहे.

प्रश्न 39 एखाद्या व्यापाऱ्याने जाणूनबुजून चुकीची, खोटी परताव्याची मागणी केल्यास अशावेळी काय तरतुद आहे ?

उत्तर अशाबाबत स्थानिक संस्था कराच्या पाच पट दंड वसुल करण्याची तरतुद आहे.

प्रश्न 40 ज्या तारखेस स्थानिक संस्था कर भरणे आवश्यक आहे त्या तारखेस स्थानिक संस्था कर भरला नाही तर काय तरतुद आहे ?

उत्तर अशा तारखेपासुन दरमहा 2 टक्के प्रमाणे व्याज वसुल करण्याची तरतुद आहे

प्रश्न 41 एखाद्या व्यापाऱ्याने स्थानिक संस्था कर भरण्यासाठी खोटी बिले, खोटी उद्‌घोषणा प्रमाणपत्रे, खोटी कागदपत्रे सादर केल्यास अशावेळी काय तरतुद आहे ?

उत्तर अशावेळी पहिल्या प्रसंगी स्थानिक संस्था कराच्या रकमेपेक्षा जास्त नसेल एवढी रक्कम वुसल करण्याची तरतुद आहे (नियम 48 (4) क). व दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या प्रसंगी, अशा मालाच्या बाबतीत, येणे असलेल्या स्थानिक संस्था कराच्या रक्कमेच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल अशी शास्ती वसुल करण्याची तरतुद आहे (नियम 48 (4) ख).

प्रश्न 42 स्थानिक संस्था कराच्या सॉफ्टवेअरमध्ये सध्या कोणत्या सुविधा सुरू आहेत ?

उत्तर स्थानिक संस्था कराचे सॉफ्टवेअर मध्ये सध्या व्यापाऱ्यांचे नोंदणीकरण व बॅंकचे चलन ची एन्ट्री करणेची सुविधा आहे. स्थानिक संस्था कर चे अंमलबजावणीसाठी इतर सर्व बांबीची जसे विवरणपत्र भरणे, ची तरतुद सॉफ्टवेअर मध्ये उपलब्ध आहे.

प्रश्न 43 स्थानिक संस्था कर कोणत्या प्रकारे व कोठे भरता येतो ?

उत्तर सद्यास्थितीत स्थानिक संस्था कर भरण्याची सुविधा बॅंक ऑफ महाराष्ट्र, एक्सीस बॅंक, आय.सी.आय.सी.आय. बॅंक व आय.डी.बी.आय. बॅंकेच्या नागपूर शहरातील सर्व शाखांमध्ये चलान द्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. बॅंक ऑफ महाराष्ट्र मध्ये NEFT/RTGS द्वारे सुद्धा स्थानिक संस्था कर भरता येतो.

प्रश्न 44 स्थानिक संस्था कराची रक्कम कशी भरता येईल ?

उत्तर स्थानिक संस्था कराची रक्कम रोख, धनादेश द्वारे किंवा NEFT/RTGS द्वारे प्राधिकृत बॅंकेत भरता येईल.

प्रश्न 45. खरेदी केलेल्या मालाची नोंद करावी लागेल काय ? त्यासाठी कोणता नमूना आहे काय?

उत्तर खरेदी केलेल्या मालाची कालक्रमानुसार व माल शहरात मिळाल्यानुसार नोंद ठेवावयाची आहे. खरेदी केलेल्या मालाच्या नोंदवही चा नमूना खालील प्रमाणे आहे.

नमूना ''घ''

अ. क्र.	विक्रेत्याचे नांव व पत्ता	स्थानिक संस्था कर नोंदणी क्रमांक	विक्रेय वस्तू	स्थानिक संस्था करासाठी आकारणी योग्य असणाऱ्या मालाची खरेदी किंमत / संस्करण आकार	देय स्थानिक संस्था कर
1	2	3	4	5	6

व्यापाऱ्यांने खरेदीची नोंदवही खालीलप्रमाणे ठेवावी :–

1) त्यांत कालक्रमानुसार नोंद असावी.

2) माल शहरात मिळालेल्या दिनांकानुसार त्याची नोंद ठेवण्यांत यावी.

3) त्यात पुढोल खरेदीचा / आयातीचा तपशील अंतर्भूत करण्यांत यावा :–

क) बिजक क्रमांक व दिनांक ....

ख) विक्री करणाऱ्या विक्रेत्यांचे / मालप्रेषकाचे नांव पत्ता

ग) जर नोंदणीकृत व्यापारी असेल तर, नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक

घ) स्थानिक व्यापारी नसल्यास , विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याकडून विक्रीसाठी माल जेथे हलविला असेल ते ठिकाण .

ङ) राखीव हस्तांतरणाच्या बाबतीत खरेदी मूल्य म्हणजे मालाची किंमत

परतु असे की, व्यापारी सदर नोंदवही संगणीकृत स्वरूपात ठेवू इच्छित असल्यास, त्यांना तशी मुभा असेल.